# प्रेमवेड्या गोविंद बर्गेचा घातपात नव्हे, आत्महत्याच! चौकशीदरम्यान वैराग पोलिस पोचले निष्कर्षाच्या टप्प्यावर!!


- नातेवाईकांची तसे काही धागेदोरे दिल्यास त्या अँगलने करता येईल तपास
- गोविंदने स्वत:ाच स्वत:वर गोळी मारुन घेतल्याची सकृती दर्शनी माहिती

सोलापूर/खास प्रतिनिधी

प्रेमवेड्या गोविंद बर्गेचा कोणी घातपात केला नसून प्रेयसी नर्तिका पूजा हिच्या प्रेम प्रकरणातून कोंडी झालेल्या बर्गे यांनी स्वत:हून स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली, या निष्कर्षापर्यंत चौकशीच्या टप्प्यावर वैराग पोलिस ठाण्याचे पोलीस पोचले असून घातपाताच्या अनुषंगाने, चौकशी केली मात्र तसा एकही पुरावा आढळून आलेला नाही, त्यामुळे बर्गे यांच्या नातेवाईकांनी केलेल्या आरोपात तथ्य दिसत नाही, तरीपण घातापाताबद्दल तसे काही पुरावे त्यांच्या नातेवाईकांची दिल्यास त्या आधारे तपास करु, अशी ग्वाही याप्रकरणात वैराग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुंदन गावडे यांनी दैनिक 'सुराज्य'शी बोलताना मंगळवार (ता.१६) दिली.

### नातेवाईकांसमोर गाडी उघडली, घातपाताचा प्रकार असल्याचे नाही आढळले काही...

मृत गोविंद याने २ सप्टेंबरला सासुरे येथे पूजा हिच्या घरापासून गाडीत स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली ती गाडी मृत गोविंदच्या नातेवाईकांच्या तसेच पंचासमोर उघडली. घटनेदरम्यान गाडी आतून लॉक केलेली होती. गाडी आतून लॉक असेल तर घातपात कसा मिळता येईल. घातपात झाला असता तर गाडी आतून लॉक केलेली नसती. घातपात करणारे लोक गाडी बाहेरुन लॉक करुन गेले असते. गाडी उघडल्यानंतर जे काही वास्तव दिसले. त्यावरुन बर्गे यांनी स्वत:हून स्वत:वर गोळी झाल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होते, असे वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी सांगितले.



### पूजावर पाण्यासारखी 'माया' ओतलेल्या मृत गोविंदच्या खिशात मरताना अवघे ९०० रुपये



प्रेमप्रकरणाच्या काळात गोविंदने पूजाला अनेक भेटी दिल्या, घरखरेदीसाठी आर्थिक मदत केली, एक प्लॉटही विकत घेऊन दिला. बुलेट घेऊन दिली. अधूनमधून कित्येक वेळा पैसे दिले. पूजाची प्रत्येकी वेळी झोळी भरली. नेमके किती पैसे दिले याची माहिती पोलिस घेत आहेत. तरीपण थोडक्यात काय तर त्यांनी तिच्यावर अक्षरश: पाण्यासारख पैसा उधळला. मात्र त्याच गोविंद बर्गेच्या खिशात मृत्यूसमयी अवघे ९०० रुपये होते अशी महत्वाची माहिती समोर आली आहे. एवढंच नव्हे तर ज्या कारमध्ये गोविंदचा मृतदेह सापडला, त्या कारमध्ये बिअरचे काही कॅन सापडले अशी माहिती समोर आली आहे.

### पिस्तूल कोणाची? याबद्दल सखोल तपास सुरु

मृत गोविंद बर्गे याच्या नावे पिस्तूलचा परवाना नसल्याची प्राथमिक माहिती आहे. शिवाय याला त्यांच्या नातेवाईकांनी दुजोरा दिला आहे. मात्र आत्महत्येसाठी त्यांनी वापरलेली पिस्तूल नेमकी कोणाची? ती कोठून आणली? वगैरे सगळ्याबाबींचा तपास सुरु आहे. आत्महत्येसाठी वापरलेली पिस्तूल त्यांची नसल्यामुळे घातपाताचा प्रकार आहे का? याबद्दल संशय बळावू शकतो, पण यासंबंधी माहिती समोर आल्यानंतरच खरा प्रकार समजेल, असे पोलिस सुत्रांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त

### पाटकुल येथे तरुणाने केले विष प्राशन

पाटकुल (ता.मोहोळ) : येथे राहणाऱ्या बाबाजी भिकाजी लोंढे (वय २०) याने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. रविवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास तो पाटकुल गावातील बेघर वस्ती जवळ विषारी द्रव प्राशन केलेल्या अवस्थेत आढळला. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून संगीता (आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### माहिती अधिकाराचा वापर केला म्हणून मारहाण



सोलापूर : शासकीय धान्य दुकानाची माहिती शासनाकडून मागवून घेतल्याच्या कारणावरून लाथाबुक्क्याने केलेल्य मारहाणीत सिद्धेश्वर चंद्रकांत कांबळे (वय ५० रा. भुताष्टे (ता.माढा) हे जखमी झाले. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारात भुताष्टे गावात घडली. सिद्धेश्वर कांबळे यांनी माहितीच्या अधिकाराखाली गावातील धान्य दुकानाची माहिती मागवली होती. त्याचा राग धरून पप्पू कसबे, बंडू भिसे आणि इतर दोघांनी मिळून त्यांना मारहाण केली त्यांना माढा येथे प्राथमिक उपचार करून त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### शांतीनगर येथे घरात चक्कर येऊन एकाचा मृत्यू

सोलापूर : मजरेवाडी परिसरातील संत रोहिदास चौक (शांती नगर) येथे राहणारे प्रकाश मारुती बामणे (वय ४९) हे मंगळवारी सकाळी उपचारास दाखल करण्यापूर्वी मयत झाले. प्रकाश बामणे यांना सकाळी नऊ वाजेच्या सुमारास अचानक श्वास घेण्यात त्रास होऊन उलट्या झाल्या होत्या. त्यांना बेशुद्ध अवस्थेत रेवणसिद्ध (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## पांढरे वस्ती ते बार्शी रोड टोलनाक्याकडे जाणारा रस्ता वाहतुकीसाठी बंद

### हिप्परगा तलावातील पाण्याचा प्रवाह वाढल्याचा परिणाम

सोलापूर/प्रतिनिधी



सोलापूर : हिप्परगा तलावातील पाणी जुन्या बार्शी रोडवर एखाद्या नदीप्रमाणे आल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झालेला दिसत आहे.

सोलापूर शहर व जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहर जिल्ह्यात रेकॉर्ड ब्रेक पाऊस झाल्याने शहरी भागात तसेच ग्रामीण लोकवस्तीत पाणीच पाणी साचलेले दृश्य पहावयास मिळाले आहे.

दम्यान शहरालगत असणारा हिप्परगा तलाव पूर्ण क्षमतेने भरल्याने सांडव्यातून येणारे पाणी शहराच्या बाळे परिसरात दाखल झाले आहे. याचा परिणाम म्हणून कारंबा नाका येथील जुना बार्शी रोड पाण्याखाली गेला आहे. हिप्परगा तलावातील हे पाणी एखाद्या नदीप्रमाणे रस्त्यावरून वाहत असल्याने सदरचा पूल पाण्याखाली गेलेला दिसत आहे.

हिप्परगा तलावाच्या सांडव्यातील वाहत असलेले हे पाणी आदिला नदीच्या प्रवाहात मिसळत आहे. त्यामुळे शहराच्या अनेक नगरात पाणीच पाणी साचलेले दिसत आहे. हिप्परगा तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर नैसर्गिक पद्धतीने हे पाणी उताराच्या दिशेने वाहत आहे. जुना कारंबा नाका, पांढरे वस्ती ते जुना बार्शी रोडवरून टोलनाक्याकडे जाणारा पूल पाण्याखाली गेलेला दिसून येत आहे. पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात असल्याने, वाहनधारकांना हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झालेला दिसून येत आहे. पावसाचा जोर आणखीन वाढल्यास या पाण्याचा प्रवाह दुपटीने वाढू शकतो असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

उत्तर, दक्षिण तसेच अक्कलकोट तालुक्यातील पावसाचे पाणी हिप्परगा तलावात दाखल होत आहे. दररोज सातत्याने रिमझिम तर रात्री मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असल्याने पाण्याची क्षमता दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे तलाव ओव्हर फ्लो होऊन हे पाणी सांडव्याद्वारे जुना बार्शी रोड वरून वाहत आदीला नदीत दाखल होत आहे. ग्रामीण भागात पावसाचा जोर आणखीन वाढल्यास पाणी पातळीत आणि प्रवाहात वाढ होऊन नागरिकांसाठी धोक्याची घंटा कायम राहणार आहे.

## माजी आमदार श्रीमती निर्मलाताई ठोकळ अनंतात विलीन

सोलापूर/प्रतिनिधी



स्व. निर्मलाताई ठोकळ

सोलापूर शहरातील ज्येष्ठ काँग्रेस नेत्या, माजी आमदार आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावलेल्या श्रीमती निर्मलाताई शंकरराव ठोकळ (वय ८५) यांचे मंगळवारी सकाळी ९ वाजता सोलापुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्यांच्या निधनाने काँग्रेस पक्षासह सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

सकाळी ११ वाजता त्यांचे पार्थिव मुरारजी पेठ येथील त्यांच्या तोरणा निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले.त्यानंतर दुपारी ४ वाजता अंत्ययात्रा निघाली. सायंकाळी पुणे रोडवरील बाळे स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले . त्यांच्या पश्चात त्यांच्या पश्चात ॲड. विपीन व सचिन ही दोन मुले, डॉ. सुनिता व शिल्पा या सुना व नातवंडे असा परिवार आहे.

निर्मला ठोकळे यांच्या निधनाबद्दल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे ,माजी मंत्री विजयसिंह मोहिते - पाटील, सिद्धाराम म्हेत्रे, आमदार रणजीतसिंह मोहिते- पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

निर्मलाताई ठोकळ यांनी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून दीर्घकाळ सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय कामगिरी बजावली होती. त्यांचा सहज-सरळ स्वभाव, लोकाभिमुख कार्यपद्धती व महिलांच्या प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका यामुळे त्यांचा जनसामान्यांत प्रभाव होता. सन २००६ साली सोलापुरात झालेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्या कार्याध्यक्ष होत्या. हे संमेलन सोलापुरात भरविण्यासाठी त्यांनी मोठा पुढाकार घेतला होता. अनेकांचा विरोध झुगारून त्यांनी हे संमेलन यशस्वी करून दाखवते. त्यावेळी त्यांचे संपूर्ण महाराष्ट्रात कौतुक झाले होते. त्यांनी विधानसभा व विधान परिषदेतही काम पाहिले आहे.

माजी विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्य राहिलेल्या निर्मलाताई ठोकळ यांचा जन्म २४ एप्रिल १९३८ रोजी झाला. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि खासदार स्व. तुळशीदास दादा जाधव यांच्या निर्मलाताई ठोकळ या कन्या. सोलापूर महापालिकेत १९६२ ते १९६७ आणि १९६९ ते १९७४ अशा दोन टर्म त्या नगरसेवक होत्या. १९७२ ते १९७८ या कालावधीत त्यांची विधानसभेवर निवड झाली तर १९८२ ते १९८८ या कालावधीत त्या महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्य होत्या. विधान परिषदेच्या आश्वासन समितीचे प्रमुख म्हणून तसेच पंचायत राज व अन्य समित्यांवर देखील त्यांनी काम केले. सोलापूर जिल्हा महिला सहकारी बँकेच्या त्या संस्थापक अध्यक्ष होत्या .महिला आर्थिक विकास महामंडळाच्या संस्थापक संचालक म्हणून त्यांनी १९७५ ते १९८४ या कालावधीत काम पाहिले. १९६८ पासून ते दीर्घकाळ इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या त्या चेअरमन होत्या. महिला प्रबोधिनी या मासिकाच्या संस्थापक संपादक म्हणून त्या कार्यरत होत्या. १९९२ ते १९९८ या कालावधीत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवरील त्या संचालक राहिल्या आहेत.

### जिल्हाधिकारी नागरिकांना सोमवारी, शुक्रवारी भेटणार

सोलापूर : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे नियमितपणे प्रत्येक आठवड्याला सोम वार व शुक्रवारी दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे अभ्यागतांना भेटत असतात. परंतु जिल्ह्यातील काही नागरिकांना जिल्हाधिकारी यांच्या भेटीच्या वेळा माहीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हाधिकारी हे नेहम ीप्रमाणेच प्रत्येक आठवड्याच्या सोमवारी व शुक्रवारी सर्वसाम ान्य नागरिकांना दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत त्यांच्या अडीअडचणीच्या अनुषंगाने भेट देतील. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी याची नोंद घ्यावी व प्रत्येक सोमवारी व शुक्रवारी दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

## सोलापुरातून तीन ठिकाणाहून मोटरसायकल गेल्या चोरीला

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतून तीन मोटरसायकल चोरीला गेल्या आहेत.

गीता नगर परिसरातून ५० हजार रुपये किमतीची काळा लाल रंगाची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने हॅन्डल लॉक तोडून चोरून नेली. दि २८ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास गीता नगर सोलापूर येथे घडली आहे. याप्रकरणी कार्तिक विशाल राठोड (वय-२३, रा. प्रताप नगर तांडा सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तपास पोलिस कर्मचारी गायकवाड करत आहेत. शहरातील ओम शांती बिअर शॉपी जवळून ३० हजार रुपये किमतीची एमएच १३ ई एन १४५८ ही मोटरसायकल अज्ञात चोरटयाने हॅन्डल लॉक तोडून चोरून नेली आहे. ही घटना दि ३ रोजी घडली आहे. याप्रकरणी लक्ष्मीकांत बसवराज कल्लुर (वय-३६, रा. विनायक नगर सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपास पोलिस कर्मचारी उबाळे करत आहेत. तिसऱ्या घटनेत होटगी रोडवरून पोलिसाची मोटरसायकल चोरीला गेली आहे. सुमारे ६० हजाराची काळ्या रंगाची एमएच १३ ई ए ८४१४ या क्रमांकाची मोटरसायकल अज्ञात चोरटयाने हॅन्डल लॉक तोडून चोरून नेली आहे. ही घटना ( दि.१४) सप्टेंबर रोजी डली आहे. याप्रकरणी मलवे नेमणूक (शहर वाहतूक शाखा सोलापूर शहर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास पोलिस कर्मचारी मुलाणी करत आहेत.

## मनोज जरांगे-पाटलांच्या मराठ्यांसाठीच्या लढ्याला यश हिंगोलीत आज पहिल्या कुणबी मराठा जात प्रमाणपत्राचे वितरण

हिंगोली/प्रतिनिधी




मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटिरच्या आधारे ओबीसीतून आरक्षण देण्यास मान्यता यापूर्वी २ सप्टेंबरच्या अध्यादेशाने देण्यात आली. त्यासंदर्भातील शासन निर्णयही जारी करण्यात आला होता. आता, त्याच जीआरच्या आधारे मराठवाड्यातील कुणबी मराठ्यांना ओबीसींचे प्रमाणपत्र जारी केले जात आहे. मराठावाडा मुक्ती संग्राम दिनाचा मुहूर्त साधत मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्याहस्ते मराठा बांधवांना हे प्रमाणपत्र दिले जात आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये उद्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशी ५० कुणबी जातींचे प्रमाणपत्र मराठा समाज बांधवांना वितरित केले जाणार आहेत.

हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवळ यांच्या हस्ते हिंगोली जिल्ह्यातील ५० मराठा समाजातील लाभार्थ्यांना उद्याच हे कुणबी जातींचे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. मराठा समाजाला मिळणारे कुणबी जातींचे प्रमाणपत्र हे तुम्हाला सर्वात अगोदर एबीपी माझावर पाहायला मिळणार आहे. एकंदरीत याची पद्धत काय आहे कशा पद्धतीने हे जातीचे प्रमाणपत्र विक्री केले जाणार आहे या संदर्भात हिंगोलीचे उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिली.

### त्रिसदस्यीस समितीकडून पडताळणी - प्रांत

महाराष्ट्र शासनाच्या २ सप्टेंबरच्या शासन निर्णयानुसार त्रिसदस्यी ग्रामस्तरीय समितीच्या पडताळणीनंतर नियमानुसार हे जात प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. ज्या अर्जदाराकडे १९६७ च्या अगोदरचा पुरावा, किंवा ज्याकडे पुरावा नसेल त्यांनी तो संबंधित गावात राहात होता, तिथे शेती होती हे सिद्ध केल्यास त्या अनुंषगाने नागरिकांचे जबाब घेऊन, चौकशी करून हे प्रमाणपत्र देण्यात येत आहेत. त्यामध्ये, रक्तासंबंधातील नातेवाईकांना यापूर्वी कुणबी नोंदीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहेत, याची खात्री करुन हे कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यात आल्याची माहिती उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिली.